DISTRICT MAGISTRATE OSMANABAD

# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

## (उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301 फॅक्स क्रमांक 02472-228018

Email ID- rdc1osmanabad@gmail.com

---

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.

3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.

4. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26

दिनांकः- 22/03/2020.

**आदेश**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी उस्मानाबाद जिल्ह्यातील विविध खाजगी ट्रॅव्हल एजन्सींच्या खाजगी बसेस (ट्रॅव्हल्स), शेअर ॲटोरिक्षा, काळ्या पिवळ्या जीप, कार, मिनीडोअर इ. प्रवासी वाहतूक करणा-या खाजगी वाहनांद्वारे विविध ठिकाणी प्रवाशांची ने-आण केली जात असल्यामुळे, या खाजगी वाहनांमधून बाधित व्यक्तींनी प्रवास केल्यास करोना विषाणू (COVID-19) चा प्रसार व प्रादुर्भाव होण्याचा धोका असल्याने प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून ही प्रवासी वाहतूक करणारी खाजगी वाहने (ट्रॅव्हल्स, शेअर ॲटोरिक्षा, काळ्या पिवळ्या जीप, कार, मिनीडोअर इ.) बंद करणे आवश्यक असल्याची माझी खात्री आहे.

त्याअर्थी मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हाधिकारी, उस्मानाबाद उपरोक्त वाचा क्र. 2 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार करोना विषाणूचा (COVID-19) होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधक उपाययोजनेचा एक भाग म्हणून **उस्मानाबाद जिल्ह्यामधील सर्व खाजगी ट्रॅव्हल एजन्सींच्या खाजगी बसेस (ट्रॅव्हल्स), शेअर ॲटोरिक्षा, काळ्या पिवळ्या जीप, कार, मिनीडोअर इ. प्रवासी वाहतूक करणारी खाजगी वाहने पुढील आदेशापर्यंत बंद करणेबाबत आदेशित करीत आहे.**

या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करून दैनंदिन अनुपालन अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणेबाबत पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद व उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, उस्मानाबाद यांना आदेशित करीत आहे.



Scanned by CamScanner

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती, संस्था अथवा संघटना उपरोक्त वाचा क्र. 2 मधील "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" चे नियम 11 नुसार, भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) कलम 188 मधील तरतुदींनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदर आदेशाची अंमलबजावणी आदेशाच्या दिनांकापासून तात्काळ लागू करण्यात येत आहे.

(दिपा मुधोळ-मुंडे)
**जिल्हाधिकारी, उस्मानाबाद**

**प्रत:-** 1. प्रधान सचिव, परिवहन विभाग, मंत्रालय, मुंबई-32 यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
4. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
5. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, उस्मानाबाद.
6. उपविभागीय अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
7. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा. पं. जि. प. उस्मानाबाद.
8. तहसिलदार सर्व जिल्हा उस्मानाबाद.
9. पोलीस निरीक्षक (वाहतूक शाखा), पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद.
10. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
11. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद व नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.

23/3/20
**जिल्हाधिकारी, उस्मानाबाद**

Scanned by CamScanner